दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | बुधवार, 29 एप्रिल 2026 | | अंक क्र. 338| वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

''आपल्या माणसांसाठी आपल्या चवींचं हॉटेल''
हॉटेल बालाजी
ब्रम्हवाडी फाटा, बीड रोड, परळी वै.


# तारकेश्वर गडाच्या विकासासाठी कटिबद्ध आ. सुरेश धस



आष्टी (प्रतिनिधी)

श्री क्षेत्र तारकेश्वर गड (महिंदा, ता. आष्टी) येथे श्री संत गुरुवर्य नारायण बाबा महाराज यांच्या १५ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित सप्ताह सांगता कार्यक्रमात आ.सुरेश धस यांनी उपस्थित राहून भाविकांशी संवाद साधला.

ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या धार्मिक सोहळ्याला मोठ्या प्रमाणावर भाविकांची उपस्थिती लाभली.

यावेळी आमदार धस यांनी श्री तारकेश्वराचे दर्शन घेत गुरुवर्य नारायण बाबा महाराज यांच्या समाधीस्थळी नतमस्तक झाले. "गुरुवर्य बाबांच्या आशीर्वादामुळेच मला जनसेवेची संधी मिळाली," अशी कृतज्ञ भावना व्यक्त केली. तारकेश्वर गडावर प्रत्येक वेळी येताना त्या आशीर्वादांची जाणीव नव्याने होत,असल्याचेही यावेळी आ.धस यांनी यावेळी सांगितले.

तारकेश्वर गड हा आष्टी विधानसभा मतदारसंघाच्या सीमेवर असून अत्यंत महत्त्वाचा आणि भक्तांचे श्रद्धास्थान असून पाथर्डी,शेवगाव, शिरूर कासार आणि आष्टी परिसरातील हजारो भाविक येथे नियमित दर्शनासाठी याठिकाणी येतात.या पवित्र स्थळी जाण्यासाठी रस्त्याची अडचण आहे हे मी मान्य करत असल्याचे सांगत

भाविकांच्या या अडचणीची गंभीर दखल घेत आमदार धस यांनी राज्य शासनाच्या हॅम योजनेअंतर्गत महिंदा ते खडकत या रस्त्याच्या सिमेंट काँक्रेटीकरणाच्या कामास मंजुरी मिळाल्याची माहिती दिली. तसेच येत्या वर्षभरात या कामास प्रत्यक्ष सुरुवात होईल, असा ठाम विश्वास त्यांनी नागरिकांना दिला. या निर्णयामुळे तारकेश्वर गडाकडे जाणाऱ्या मार्गाचा कायापालट होणार असून भाविकांची सोय मोठ्या प्रमाणात होणार असल्याचे सांगितले.

तसेच गडाच्या सर्वांगीण विकासासाठी मी नेहमी कटिबद्ध असल्याचेही आ.धस यांनी सांगितले.

या प्रसंगी ह.भ.प. तुकाराम महाराज मुंढे, ह.भ.प. रोहिदास महाराज गर्जे, ह.भ.प. अनिल देवळकर महाराज यांच्यासह राहुल राजळे, विक्रम राजे भोसले, गणेश आव्हाड, अंकुश चितळे, अनिल मोहिते, दिनकर तांदळे, आजिनाथ सानप, सरपंच दहिफळे, माणिक दहिफळे, विठ्ठल गर्जे, शंकर मिसाळ, विष्णु दहिफळे, वसंत मिसाळ तसेच पंचक्रोशीतील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रस्ता दुरूस्ती, टोल नाक्यावरील स्वच्छतागृह आणि पथदिवे सुरू करा ; मागणीसाठी संभाजी ब्रिगेडचा १ मे रोजी आमरण उपोषणाचा इशारा

### सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

उंदरी (ता.केज) ते गांजपूर मार्गे जानेगाव (जि.बीड) या रस्त्यावर तात्काळ कार्पेट करण्यात यावे, बीड जिल्ह्यातील काही टोलनाक्यावरील स्वच्छतागृह बंद आहेत. तसेच बंद पथदिवे ही सुरू करावेत या मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने शुक्रवार, दिनांक १ मे २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा संभाजी ब्रिगेडचे विभागीय सचिव प्रवीण ठोंबरे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.



संभाजी ब्रिगेडच्या वतीने शेतकऱ्यांच्या सन्मानार्थ संभाजी ब्रिगेड मैदानात हे ब्रीद घेऊन सेवा कार्य सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून काही दिवसांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांना एक निवेदन देण्यात आले. सदरील निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, उंदरी (ता.केज) ते गांजपूर मार्गे जानेगाव (जि.बीड) या रस्त्यावर बी.बी.एम करून तीन वर्षे होत आली आहेत. तरी अद्याप ही या रस्त्यावर कार्पेट करण्यात आलेले नाही. सदरील रस्ता नादुरूस्त झाला आहे. त्यामुळे सदरील रस्त्यावर तात्काळ कार्पेट करण्यात यावे, यासोबतच बीड जिल्ह्यातील काही टोलनाक्यावरील स्वच्छतागृह बंद आहेत. विशेषतः यामुळे महिला भगिनींची गैरसोय होत आहे. तरी टोलनाक्यावरील स्वच्छतागृह सुरू करण्यात यावीत. तसेच प्रमुख रस्त्यांवरील बंद पथदिवे ही सुरू करावेत या मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने शुक्रवार, दिनांक १ मे २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा संभाजी ब्रिगेडचे विभागीय सचिव प्रवीण ठोंबरे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. या मागण्यांसाठी देण्यात आलेल्या निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे मराठवाडा विभागीय सचिव प्रवीण उत्तमराव ठोंबरे, बीड जिल्हाध्यक्ष राहूल खोडसे, नारायणराव मुळे (जिल्हा सचिव, संभाजी ब्रिगेड, बीड.), मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के, ॲड.प्रशांत शिंदे, श्रीमती सुनंदा लोखंडे (जिल्हाध्यक्षा महिला आघाडी, संभाजी ब्रिगेड बीड.), केशव टेहरे (जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड विद्यार्थी आघाडी, बीड), सतिष कुंडगर (जिल्हा उपाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड विद्यार्थी आघाडी, बीड), रविंद्र ढगे, भागवत इंगळे, बालाजी यादव, ओमकार पौळ, दीपक ढवळे, शिवप्रसाद जाधव, संभाजी वाळवटे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## परळी वैजनाथ शहरातील 1 ते 17 प्रभागांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी पाईप लाईनची कामे होणार

### १५ व्या वित्त आयोगातून शहरातील आवश्यक त्या ठिकाणच्या सहा किलोमीटर पाईपलाईनच्या कामांना मंजुरी - नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी

परळी वैजनाथ: प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नगरपरिषदेने प्रस्तावित केलेल्या कामांना जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या बंधनकारक अनुदानातून एकूण १ कोटी ९६ लाख ९५ हजार ६३९ रुपयांच्या निधीला ही मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे परळी वैजनाथ शहरातील प्रभाग क्रमांक एक ते सतरा या प्रभागांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी पाणी पुरवठा पाईप लाईनची विस्तारीत कामे होणार आहेत. सर्व प्रभागांमध्ये मिळून एकूण सहा किलोमीटरची पाईपलाईन ची कामे यामधून केली जाणार आहेत. अशी माहिती नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली आहे.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगरपरिषदेने शहरातील प्रभाग १ ते १७ मध्ये

नगरपरिषद परळी वैजनाथ
नगरहितं मम कर्तव्यम्
स्थापना १९५२

पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी विस्तारित नवीन पाईप लाईन टाकण्याचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बीड यांनी तांत्रिक मान्यता दिल्यानंतर आता जिल्हाधिकाऱ्यांनी अंतिम प्रशासकीय मंजुरी दिली आहे.शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, मंजूर रक्कम ही पाणीपुरवठा व्यवस्थापन, पाण्याचे शुद्धीकरण आणि रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी वापरली जाणार आहे. सध्याच्या मंजुरीनुसार, शहरातील प्रभाग क्रमांक एक ते 17 या प्रभागांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी पाणीपुरवठ्याची पाईप लाईन विस्तारण्याचे काम हाती घेतले जाणार आहे.या निर्णयामुळे परळी शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार असून ज्या भागात पाईप लाईन नव्हती त्या ठिकाणी विस्तारित पाईप लाईन टाकली जाणार आहे. मंजूर निधीमधून विविध प्रभागांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी पाईपलाईन ची मंजूर असलेली एकूण सहा किलोमीटरची कामे केली जाणार आहेत. या अनुषंगाने पाणी पुरवठयाबाबत नागरिकांना दिलासा मिळणार आहे असा विश्वास नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजाखान पठाण, पाणी पुरवठा सभापती सौ जयश्रीताई गीते, मुख्याधिकारी पी एन निगळ यांनी व्यक्त केला आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत बनणे हीच खरी जयंती; नागपिंपरी येथे १३५ वी जयंती उत्साहात साजरी





परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी तालुक्यातील नागपिंपरी येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहात आणि वैचारिक वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून प्रबोधनपर विचार मांडले.

■ **व्यसनांपासून दूर राहून नवा संकल्प करा: रोहिदास हातागळे**

"दूरदर्शन"चे बीड जिल्हा प्रतिनिधी रोहिदास हातागळे यांनी यावेळी युवकांना मोलाचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, "आजच्या पिढीने केवळ उत्सव साजरा न करता, प्रत्येक जयंतीला एक नवीन संकल्प हाती घेतला पाहिजे. युवकांनी व्यसनांच्या आहारी न जाता आपल्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करावे." तसेच, सामाजिक मूल्यांसोबतच कौटुंबिक मूल्यांची जपणूक करण्याचा सल्ला देताना त्यांनी नमूद केले की, घरामध्ये वडीलधाऱ्यांचा मान राखला पाहिजे आणि सुनांनी सासूबाईंशी माय-लेकीप्रमाणे वागावे, जेणेकरून घराघरांत शांतता राहील.

■ **शिक्षण हेच प्रगतीचे साधन: ले. कर्नल मधुकर कांबळे**

लेफ्टनंट कर्नल मधुकर कांबळे यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गुलामगिरीच्या व्यवस्थेतून समाजाला बाहेर काढण्याचे काम केवळ शिक्षणाच्या जोरावर केले. शेती, व्यवसाय किंवा नोकरी कोणत्याही क्षेत्रात प्रगती करायची असेल, तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही." आंबेडकरांनी दिलेला शिक्षणाचा संदेश आणि सावित्रीबाई फुलेंनी सुरू केलेली स्त्री शिक्षणाची गंगा यामुळेच आज महिलांची प्रगती होत आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण तसेच मान्यवरांच्या हस्ते निळ्या ध्वजाच्या ध्वजारोहणाने करण्यात आली. यावेळी विचारपीठावर दूरदर्शनचे जिल्हा प्रतिनिधी रोहिदास हातागळे, कर्नल एम. एच. कांबळे, बीआरएसपीचे राज्य सचिव ॲड. माणिक आदमाने, गावचे सरपंच अंकुश मुंडे आणि माजी सरपंच यशवंत भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

ॲड. माणिक आदमाने यांनी बाबासाहेबांच्या जागतिक स्तरावरील कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी गावातील अनेक विद्यार्थ्यांनी जयंती निमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर भाषणं केली, मान्यवरांच्या हस्ते त्यांना प्रोत्साहनपर बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. वसंत हजारे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रदीप आदमाने यांनी मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समिती, नागपिंपरी येथील कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये सिद्धार्थ आदमाने, राजाभाऊ आदमाने, अमोल आदमाने, शैलेश बनसोडे, पवन कदम, आदित्य कांबळे, अनंत आदमाने, विजय आदमाने, शांतीदूत बोडखे, प्रशांत आदमाने यांच्यासह गावातील तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भुसावळात दिलीप घोडेस्वारांनी आंबेडकरी चळवळ प्रवाहीत ठेवून कार्यकर्तेही घडवले

## साहित्य जगत | एकदिवसीय आशादीप साहित्योत्सवात कवी वा. ना. आंधळेंचे गौरवोद्गार

**भुसावळ :** सत्तर ते नव्वदच्या दशकात आंबेडकरी चळवळीचे केंद्र म्हणून भुसावळ ओळखले जायचे. ही चळवळ निरंतर प्रवाहीत ठेवून कार्यकर्ते घडवण्याचे काम स्वर्गीय दिलीप घोडेस्वार यांनी केले. बुद्ध धम्माचा निस्सीम अनुयायी म्हणून ते ख्यातकीर्त राहिले. त्यांची साहित्य साधना अफाट आहे, अशी भावना एरंडोलचे कवी वा. ना. आंधळे यांनी येथे व्यक्त केली.

भुसावळच्या श्रीकृष्णचंद्र सभागृहात रविवारी प्रज्ञा हंसराज बागुल यांनी एकदिवसीय आशादीप साहित्योत्सव आयोजित केला होता. त्यात अध्यक्षस्थानावरून कवी आंधळे हे बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मिलिंद बागुल, प्रवीण कांबळे, प्रा. गौतम निकम, कवयित्री पुष्पा साळवे, सुमंगल अहिरे, सुरेश भालेराव, डॉ. भारत सातपुते यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट कथासंग्रह, कवितासंग्रह, कादंबरी, ललित लेखनाला पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आंबेडकरी चळवळीचे लेखक कवी स्मृतीशेष दिलीप घोडेस्वार यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यांची कन्या प्रज्ञा बागुल यांच्या 'संदर्भ जगण्याचे' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. 'हा काव्यसंग्रह मानवी जीवनाचे भावभावनांचे कंगोरे उलगडणारा आहे. किंबहुना, बापाप्रती कृतज्ञतेची भावना त्यातून व्यक्त होते' असे मत डॉ. सातपुते यांनी मनोगतातून व्यक्त केले.



कार्यक्रमाचे रसाळ सूत्रसंचालन मुंबईच्या कविता मोरवणकर यांनी केले. यशस्वीतेसाठी आशा घोडेस्वार, प्रज्ञा बागुल, सविता घोडेस्वार, पुजा घोडेस्वार व परिवाराने परिश्रम घेतले.

### ■ चळवळ घराघरात पोहोचवली...

लेखक दिलीप घोडेस्वार यांच्या लेखणीतून प्रसवलेले साहित्य समाजाला प्रेरणा देणारे आहे. सत्तर ते नव्वदच्या दशकात त्यांनी चळवळीच्या अनुषंगाने देशभरात प्रकाशित होणारे साहित्य खान्देशात पोहोचवण्यासाठी महत्वाची भूमिका निभावली आहे. म्हणूनच तर व्रतस्थ कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख आहे. समाजजीवनात वावरताना प्रतिकुलता त्यांना कधीच आडवी आली नाही. स्वाभिमान कधीच डगमगला नाही. नम्रतेची कास त्यांनी सोडली नाही. त्यांचा हाच वारसा कन्या प्रज्ञा बागुल या समर्थपणे पुढे नेत आहेत, अशी भावना कवी आंधळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केली.

### ■ घोडेस्वार हे चळवळ जगले....

कवी, लेखक दिलीप घोडेस्वार हे आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत चळवळ जगले. आंबेडकरी विचारांशी त्यांनी कधीच फारकत घेतली नाही. आंबेडकरी विचारांचे वाहक म्हणून त्यांनी उमेदीचा काळ खर्ची घातला. पद, प्रतिष्ठा, पैसा या गोष्टींना त्यांनी कधीच महत्व दिले नाही. नागपूरपासून ते मुंबईपर्यंत त्यांच्या नावाचा आदरयुक्त दबदबा होता. भुसावळला त्यांच्या सेवाभावी कार्यामुळे वेगळी ओळख मिळाली. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, पत्रकारीता अशा विविध क्षेत्रात त्यांचा मित्रमेळा होता. माणसं जोडण्याची कला त्यांना अवगत होती, असे नागपूरचे लेखक प्रवीण कांबळे यांनी नमूद केले.

### ■ वडीलांचा वारसा पुढे नेतेय.....

चळवळीत काम करीत असलेल्या वडीलांमुळे अनेक सेवाव्रतींचा सहवास कुटुंबाला लाभला आहे. त्यांनी लिहिलेली साहित्य संपदा जीवापाड जपून ठेवली आहे. त्यांचे जे अप्रकाशित साहित्य आहे ते हळूहळू प्रकाशित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी दिलेल्या बाळकडूच्या बळावरच वेगवेगळ्या भाषेत लिखाण करण्यावर भर दिला आहे. आशादीप साहित्योत्सवाच्या माध्यमातून त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. भविष्यात कविसंमेलन, चर्चासत्र, परिसंवाद असे विविध कार्यक्रम घेण्याचा मानस आहे. भुसावळांनी दिलेले प्रेम शब्दातीत आहे, असे मत प्रज्ञा बागुल यांनी व्यक्त केले.

---

**येत्या मंगळवार दिनांक 28 एप्रिल 2026 रोजी मुंबई येथे महाराष्ट्राचे मुख्य सचिव श्री राजेश अग्रवाल आयएएस यांच्या हस्ते उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सुप्रसिद्ध आय ए एस अधिकारी श्री दिलीप स्वामी यांचा सत्कार होत आहे. त्यानिमित्त**

# सतत पुरस्कारासाठी पात्र ठरलेले सनदी अधिकारी श्री दिलीप स्वामी

महाराष्ट्राच्या प्रशासनात सर्वोच्च पदावर असलेल्या मुख्य सचिवांच्या हस्ते एखाद्या आयएएस अधिकाऱ्याचा सन्मान होणे सत्कार होणे ही फारच मानाची गोष्ट आहे. तो मान यावर्षी महाराष्ट्रातील संभाजीनगरचे तत्कालीन जिल्हाधिकारी व सध्या महाबीजचे महाव्यवस्थापक असलेले श्री दिलीप स्वामी यांना प्राप्त झाला आहे. लागोपाठ पुरस्कारास पात्र ठरलेले आयएएस अधिकारी म्हणून त्यांचा संपूर्ण महाराष्ट्रात बोलबाला आहे. यावर्षी महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाने अतिशय उत्कृष्ट कार्य करून आदर्श प्रस्थापित केल्याबद्दल श्री दिलीप स्वामी यांना हा पुरस्कार प्रदान करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या आयुक्तांनी लिहिलेल्या या पत्रात आपले हे कार्य महाराष्ट्रातील इतर सर्व पुण्यातील जिल्हाधिकाऱ्यांना प्रेरणा देणारे आहे म्हणून आपला हा सत्कार करण्यात येणार आहे असे त्यांनी लिहिले आहे. श्री दिलीप स्वामी यांचा हा सत्कार समारंभ येत्या मंगळवार दि. 28 एप्रिल 2026 रोजी सकाळी 11 वाजता मलबार हिलवरील सुप्रसिद्ध अशा शासकीय सह्याद्री अतिथिगृहात संपन्न होणार आहे. महाराष्ट्र राज्याचे सर्वोच्च प्रशासकीय अधिकारी म्हणजे मुख्य सचिव श्री राजेश अग्रवाल यांच्या हस्ते श्री दिलीप स्वामी यांचा हा सत्कार होणार आहे .

यापूर्वी देखील महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी ऑक्टोबर महिन्यामध्ये दहा तारखेला श्री दिलीप स्वामी जिल्हाधिकारी संभाजीनगर यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांनी महसूल विभागामध्ये जी अभिनव कार्यपद्धती अवलंबली त्याबद्दल त्यांना पुरस्कृत करून त्यांचे अभिनंदन केले असून ही कार्यपद्धती संपूर्ण महाराष्ट्रात असलेल्या जिल्ह्यांमध्ये राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

संभाजीनगर येथे येण्यापूर्वी श्री दिलीप स्वामीसाहेब सोलापूरला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असताना त्यांनी सोलापूर जिल्हा परिषदेसाठी तसेच सोलापूर जिल्हा परिषदेतील शाळांसाठी जो अभिनव उपक्रम राबविला तो देखील असा स्तुत्य होता. या अभिनव उपक्रमाची दखल घेऊन आपल्या महाराष्ट्राचे तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री



अजित पवार यांनी देखील त्यांना पुरस्कृत करून हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात योग्य आहे असे विधान करून श्री दिलीप स्वामी यांच्या कार्यावर शिक्कामोर्तब केलेले आहे.

साहेब विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथे उपविभागीय अधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी उल्लेखनीय कार्य केले. आपला यवतमाळ जिल्हा हा संपूर्ण भारतामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. हे पुसून टाकण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. यवतमाळ जिल्ह्यातीलपुसद हे माजी मुख्यमंत्री श्री वसंतराव नाईक व माजी मुख्यमंत्री श्री सुधाकरराव नाईक यांचे गाव. या तालुक्याच्या गावी राहून त्यांनी शेतकऱ्यांचे मनोबल वाढविले. शेतकऱ्यांमध्ये ते मिसळले. यांचे सुखदुःख जाणून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यांच्या घरापर्यंत ते गेले. त्यांच्यासाठी विविध योजना राबविल्या. त्याचा असा परिणाम झाला की पुसद तालुक्यातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण बऱ्याच अंशी कमी झाले. त्यांच्या या कार्याची दखल प्रसार माध्यमांनी घेऊन त्यांना खरेखुरे आयडॉल संबोधून त्यांचा खरेखुरे आयडॉल या बहु चर्चित ग्रंथात समावेश केला आहे .

श्री दिलीप स्वामी यांचा माझा परिचय खूप जुना आहे. त्याला आता तीस वर्षाचा कालावधी होईल. योगायोगाने त्यांचे पहिली पोस्टिंग उपजिल्हाधिकारी म्हणून अमरावती येथेच झाले. त्यांचे मित्र श्री अविनाश हदगल व श्री संजय सरवदे हे देखील अमरावतीला उपजिल्हाधिकारी म्हणून रुजू झाले. त्यांचे प्रशिक्षण सुरू झाले. त्यांना अमरावतीच्या कॅम्प विभागातील कांता नगर या शासकीय वसाहतीत राहण्यास बंगला मिळाला. योगायोगाने माझा बंगला महापौरांच्या बंगल्यासमोर आणि रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला शासकीय वसाहत. साहेबांच्या चांगल्या स्वभावामुळे व माझ्या मिशन आय ए एस च्या कार्यामुळे ऋणानुबंध जुळून यायला वेळ लागला नाही.

आपल्या प्रशिक्षण काळात श्री दिलीप स्वामी आमच्या विविध उपक्रमात सहभागी झाले. विशेष म्हणजे 10 ऑगस्ट 2002 रोजी आम्ही डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीच्या अंतर्गत मिशन आयएएस अभ्यासिका व ग्रंथालय सुरू केले. त्याचे उद्घाटन श्री दिलीप स्वामी यांच्या हस्ते झाले . तेव्हा ते अमरावतीला उपविभागीय अधिकारी म्हणून कार्यरत होते.आज या गोष्टीला 24 वर्षे पूर्ण होत आहेत.

श्री दिलीप स्वामी यांची बदली वेगवेगळ्या ठिकाणी होत गेली. परंतु ते कायम संपर्कात होते आणि आजही आहेत. मला आठवते स्वामी साहेबांना एवढे पुरस्कार एवढा त्यांचा गौरव होण्यामागे त्यांची कर्तव्यनिष्ठता तत्परता कारणीभूत आहे. ते

यासाठी एकच उदाहरण पुरेसे आहे

साहेब अमरावतीला उपविभागीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. तो जूनचा महिना होता. मुलांना उत्पन्नाचे दाखले जातीचे दाखले रहिवासी प्रमाणपत्र याच महिन्यात पाहिजे असतात. साहेबांकडे प्रचंड अर्ज यायला लागले. तेव्हा आजच्यासारखी संगणक व्यवस्था उपलब्ध नव्हती. बऱ्याच चा कार्यभार टंकलेखन व हस्ताक्षरातच चालायचा. साहेब दिवस-रात्र काम करू लागले. आपण एखाद्याला सोबत घेऊन हे काम करावे असे त्यांना वाटले म्हणून त्यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी यांना विनंती केली की सर माझ्याकडे कामाचा व्याप खूप वाढला आहे. मी रात्रंदिवस काम करीत आहे तरी मला आपण जर एक सहकारी दिला तर हे काम लवकर होईल.

स्वामी साहेबांचा स्वभाव रोजचे काम रोज करणे हा होता आणि आजही आहे त्यांना कोणतेही काम सांगा ते नियमात बसत असेल तर ते त्याच दिवशी करतात. त्यांच्या मदतीला जे सहकारी आले त्यांच्या फायली पेंडिंग राहू लागल्या. साहेबांना हे कळले. साहेब आपले काम तर करीत होते पण सहकारी मित्रामुळे लोकांच्या तक्रारी यायला लागल्या. अनेक लोकांना बाहेरगावी प्रवेश घ्यायचे असतात .त्यासाठी त्यांना दाखले तात्काळ पाहिजे असतात .शेवटी साहेबांनी ठरविले .मी रात्रीचा दिवस करेल पण मुलांना त्याच दिवशी प्रमाणपत्र मिळेल यासाठी शंभर टक्के प्रयत्न करेल आणि त्यांनी तसे करून दाखविले .त्यासाठी प्रसंगी त्यांना भरपूर जागरण करावे लागले. परिवाराकडे दुर्लक्ष करावे लागले

अमरावतीच्या सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक चळवळीमध्ये साहेबांनी स्वतःला झोकून दिले आहे. साहेबांच्या बदल्या होत गेल्या .पण त्यांची अमरावतीची नाळ आजही कायम आहे. अमरावती फेस्टिवल ही साहेबांच्या काळात सुरू झालेली योजना. ती आजही कायम आहे. साहेब कुठेही असले तरी दरवर्षी न चुकता अमरावती फेस्टिवलला उपस्थिती लावतात .हा माझाच कार्यक्रम आहे .या नात्याने ते रसिकांमध्ये बसतात. मी मोठा आय ए एस.अधिकारी आहे या या नात्याने ते कधीच वागत नाहीत.त्यामुळे सर्वांना ते आपलेसे वाटतात.

सदैव आपल्या कामात तत्पर राहिल्यामुळे त्यांना लागोपाठ महाराष्ट्र शासनाने तसेच माननीय मुख्यमंत्र्यांनी पुरस्कृत केले आहे .ही आमच्यासाठी मोठी आनंदाची बाब आहे. साहेब जेव्हा अमरावतीला येतात तेव्हा त्यांचे आणि आमचे जिवलग मित्र सहायक आयुक्त श्री ओम प्रकाश चर्जन यांच्यामार्फत आम्हाला त्यांचा फोन येतो. मी अमरावतीला येत आहे .तुम्ही अमरावतीलाच थांबा .आपण भेटू या .सोबत जेवण घेऊ या. चर्चा करू या. त्यांचा फोन आला म्हणजे आम्हाला खूप धन्य वाटते.

परवा संभाजीनगरला मी गेलो. महात्मा गांधी विद्यापीठात एका कार्यक्रमाला गेलो होतो. बरोबर माझे सत्यशोधक मित्र श्री के.ई. हरिदास हे होते. कार्यक्रम आटोपल्यानंतर मी साहेबांना भेटावयास जिल्हाधिकारी कार्यालयात गेलो. साहेबांची भेट झाली .मी साहेबांना आमच्या ग्रीष्मकालीन शिबिराचे निमंत्रण दिले. साहेबांनी ते स्वीकारले. 16 ते 22 मे च्या दरम्यान आम्ही अमरावतीच्या भव्य अशा सिकची रिसॉर्टमध्ये स्पर्धा परीक्षा संस्कार शिबिराचे आयोजन केले आहे .त्याचे उद्घाटन साहेबांचे हस्ते होत आहे. एक कर्तव्यदक्ष कर्तव्य तत्पर आदर्श व्यक्तिमत्व असलेले आयएएस अधिकारी नव्याने आयएएस इच्छिणाऱ्या तरुण युवकांना मार्गदर्शन करण्यासाठी त्या निमित्ताने येणार आहेत.

मंगळवार दिनांक 28 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता मुंबईला साहेबांचा होणारा हा सन्मान खरोखरच माननीय आयुक्तांनी लिहिल्या प्रमाणे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना प्रेरणा देणारा असाच आहे .कारण साहेबांनी 90% काम ठरलेल्या कालावधीत पूर्ण केले आहे. एखादी योजना ठरलेल्या कालावधीमध्ये 90% पूर्ण करणे म्हणजे कठीणच काम असते. या कामात त्यांच्या अधिकारी मित्रांची व कर्मचारी मित्रांची देखील त्यांना सुसंगत लाभली आहे हे वेगळे सांगणे न लगेच. त्यामुळे ते हे यश यश गाठू शकले. याची त्यांना देखील जाणीव आहे आणि ती त्यांनी व्यक्तही केली आहे.

साहेबांच्या या यशात सौ वहिनी साहेबांचा मोलाचा वाटा आहे हे वेगळे सांगणे न लगे. समर्थ साथ मिळाली म्हणजे आणि समविचारी साथ मिळाली म्हणजे रथाची दोन्हीही चाके सुरळीत प्रगतीकडे वाटचाल करतात .तसे साहेबांचे आणि वहिनीसाहेबांचे जुळलेले समीकरण आहे आणि याचमुळे ते पुढे पुढे जात आहेत .त्यांनी असेच पुढे पुढे जावे हे मनापासून वाटते आणि वाटत राहणार आहे. त्यांना प्राप्त होणाऱ्या सत्काराबद्दल सन्मानाबद्दल मनापासून अभिनंदन व शुभेच्छा

**– प्रा. डॉ.नरेशचंद्र काठोळे, संचालक, मिशन आयएएस, डॉ. पंजाबराव देशमुख अकादमी, अमरावती कॅम्प 9890967003**

---

# माणुसकीचा 'आरोग्यदूत': मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून संकेत सानप यांची 'सेवा' सुरूच!

**नाशिक:** आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी जगात जिथे माणुसकी हरवत चालली आहे, तिथे काही व्यक्ती आपल्या निःस्वार्थ कार्यातून समाजासमोर आदर्श उभा करत आहेत. संगमनेर तालुक्यातील आदर्श गावचे सुपुत्र आणि सध्या मुंबई-ठाणे येथे स्थायिक असलेले श्री. संकेत सुमन तुकाराम सानप हे अशाच एका सेवेचे नाव बनले आहे. त्यांच्या याच अतुलनीय कार्याची दखल घेत 'सक्षम पोलीस टाइम्स' च्या वतीने नाशिक येथे त्यांना 'राज्यस्तरीय सक्षमरत्न २०२६' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

संकट काळातील रुग्णांचा आधार

'आरोग्य हीच खरी संपत्ती' असली तरी, गरिबीमुळे अनेक कुटुंबांना गंभीर आजारांवरील उपचार करणे अशक्य होते. अशा वेळी सरकारी योजना आणि गरजू रुग्ण यांच्यातील दुवा बनण्याचे कठीण काम संकेत सानप यांनी स्वीकारले आहे. केवळ शब्दांची सेवा न करता, प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून आजवर १०० पेक्षा अधिक रुग्णांना मोलाची आर्थिक मदत मिळवून दिली आहे.

जेव्हा एखादा रुग्ण हॉस्पिटलच्या खाटावर मृत्यूशी झुंज देत असतो आणि कुटुंबाकडे उपचारासाठी पैसे नसतात, तेव्हा संकेत सानप त्यांच्यासाठी 'आरोग्यदूत' म्हणून उभे राहतात. कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यापासून ते प्रत्यक्ष निधी मंजूर होईपर्यंत त्यांचा पाठपुरावा अत्यंत कौतुकास्पद असतो.

ग्रामीण संस्कार आणि महानगरातील सेवा

अहिल्यानगर जिल्ह्यातील मातीतील एका शेतकरी कुटुंबातील संस्कार घेऊन संकेत सानप मुंबई-ठाण्यासारख्या महानगरात स्थायिक झाले. मात्र, शहरात राहूनही त्यांनी आपल्या ग्रामीण भागातील नाळ तुटू दिली नाही. उलट, आपल्या संपर्काचा आणि अनुभवाचा वापर त्यांनी समाजातील शेवटच्या घटकासाठी केला. गरीब कुटुंबाच्या डोळ्यातील अश्रू पुसून त्यांना नवजीवन देणे, हे कोणत्याही मोठ्या पुरस्कारापेक्षा श्रेष्ठ कार्य असल्याचे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे.




# नेल कटर



नेल कटरचा (Nail Cutter) शोध व्हॅलेंटाईन फोग्टी या व्यक्तीने लावला असे मानले जाते. या छोट्याशा पण अत्यंत उपयुक्त साधनाचा इतिहास खूप रंजक आहे. व्हॅलेंटाईन फोग्टी यांनी नेल कटरचा शोध लावला. नेल कटरचे पहिले पेटंट १८८१ मध्ये युजीन हाइम यांनी घेतले होते. त्यानंतर १८८० च्या उत्तरार्धात आणि १९०० च्या दशकाच्या सुरुवातीला अनेक प्रकारांचे पेटंट घेतले गेले. नेल कटर येण्यापूर्वी, लोक नखे कापण्यासाठी धारदार दगड, छोटे चाकू किंवा वस्तऱ्याचा वापर करत असत. अनेकदा नखे दगडावर घासून लहान केली जात. सुरुवातीचे नेल कटर आजच्यासारखे प्रगत नव्हते. काळाच्या ओघात, तंत्रज्ञानाचा विकास होऊन नेल कटर अधिक सुरक्षित आणि वापरण्यास सोपे बनले.जरी पेटंट अनेक लोकांच्या नावावर असले, तरी आधुनिक नेल कटरच्या विकासाचे श्रेय व्हॅलेंटाईन फोग्टी यांना दिले जाते.

# केजमध्ये भीषण आग : पाच दुकाने भस्मसात, लाखोंचे नुकसान



केज | प्रतिनिधी

शहरातील मंगळवार पेठ परिसरात मंगळवार (दि.२८) रोजी सकाळी सुमारे ११:३० वाजण्याच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत पाच दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली. या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाले असून व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. अनिल अशोक सूर्यवंशी यांचे गजानन ॲग्रो एजन्सी या कृषी सेवा केंद्रातून आगीची सुरुवात झाली. आगीने काही क्षणातच भीषण रूप धारण करत शेजारील दुकाने गाठली.

या आगीत गजानन ॲग्रो एजन्सीमधील किटकनाशके, तणनाशके, विद्राव्य खते, लिंबोळी पेंड तसेच दुकानातील फर्निचर जळून खाक झाले असून सुमारे १२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.

तसेच शेजारील खंडेश्वर पशु खाद्य ट्रेडर्स, प्रकाश मुंडे यांचे मोटार व इलेक्ट्रिक दुरुस्तीचे दुकान, नारायण नेहरकर यांचे चहाचे हॉटेल आणि दत्ता देशमुख यांचा दत्तात्रय फोटो स्टुडिओ या दुकानांनाही आगीचा फटका बसला. मोटार रिवाइंडिंग, पशुखाद्य व हॉटेल व्यवसायिकांचेही मोठे नुकसान झाले आहे.

आगीची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. पुढील तपास सुरू आहे.

# प्रबोधनाचा लोकस्वर : स्मृतिशेष आबाजीराव तायडे (अण्णा)

**महात्मा बुद्ध-शिवराय -फुले -शाहू - डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचे क्रांतीदर्शी विचार व आंबेडकरी समाजप्रबोधनात्मक जाणिवांचे आशयसूत्र जनमानसात पोचवणारे लोकगायक तथा सेवानिवृत्त तंत्रज्ञ आमचे वडील स्मृतिशेष आबाजीराव तायडे (अण्णा) यांचा २९ एप्रिल स्मृती दिन. त्या निमित्ताने या समृद्ध पर्वाचा अर्थातच अण्णांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक कार्याचा आढावा घेण्याचा हा प्रयत्न....**

आपल्या देशात सामाजिक आणि सांस्कृतिक प्रबोधन करणाऱ्या मंडळींची मोठी परंपरा आहे. आपल्या परिवर्तनीय गायकीतून समाजमनाला जागृत करण्यासाठी १९६५ साली "समाज सुधारक गायन मंडळ" स्थापन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आंगलगाव ता. जि. परभणी येथे लोकगायक स्मृतिशेष आबाजी मेसाजी तायडे, यादव कांबळे, ज्ञानोबा कांबळे, देविदास नाटकर, लिंबाजी मस्के, वामन कांबळे, हरिभाऊ कांबळे, रंगनाथ कांबळे, गंगाराम साबणे, शेषेराव साबणे, मूंजाजी कांबळे, पिराजी कांबळे, त्र्यंबक तायडे, लक्ष्मण तायडे, अशोक कांबळे, साहेबराव तायडे, या सर्व समविचारी उपासकांच्या साथीने "समाज सुधारक गायन मंडळाची उभारणी केली.

समाजाचे अंतरंग उजळण्यासाठी या सर्व भीमसैनिकांनी सांस्कृतिक चळवळ सुरू केली. महाराष्ट्रभर बुद्ध-भीम गीतांचे जोशपूर्ण सादरीकरण केले. उपजत कलात्मक ज्ञानाचा कसलाही अभिनिवेश न बाळगता समाजातील अशिक्षित, अल्पशिक्षित, श्रमिक, कष्टकरी लोकांचं प्रबोधन केलं. या गायन मंडळात प्रमुख गायक म्हणून कालकथीत आबाजीराव तायडे, यादव कांबळे तसेच हरिभाऊ कांबळे, त्र्यंबक तायडे हे उत्कृष्ठ ढोलकीपटू पंचक्रोशीत प्रसिद्ध झाले. यादव कांबळे, मुंजाजी कांबळे हार्मोनियम, देविदास नाटकर झांज, लिंबाजी मस्के कडीवादन करायचे तर गंगाराम साबणे, शेषराव साबणे साथ-संगत करायचे.

ज्या कुटुंबात शिक्षणाचा गंध नाही, अशा कुटुंबात आबाजी तायडे (अण्णा) यांचा जन्म ०३ ऑगस्ट १९५० रोजी परभणी जिल्ह्यातील आंगलगाव येथे झाला. (मूळगाव बोंदरगाव). ज्या कालखंडात त्यांचा जन्म झाला, तो काळ सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक आणि स्वातंत्र्योत्तर चळवळीने भारलेला होता. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक चळवळीने संपूर्ण महाराष्ट्र जागा झालेला होता. अशा काळात आबाजी तायडे (अण्णा) यांचे बालपण गेले. त्यांचे शालेय शिक्षण प्रतिकूल परिस्थितीत झाले. परिस्थितीशी दोन हात करत, मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण घेतले. ७० वर्षांच्या समग्र जीवनप्रवासात त्यांची पत्नी आमची आई सत्यभामा आबाजी तायडे यांनी, मोठया धैर्याने त्यांना साथ दिली. अण्णांच्या वैयक्तिक, सार्वजनिक जीवनात आईंनी सर्वांना एकोप्याने सांभाळले. आई-अण्णांनी कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या पेलत घराला आधार दिला. आम्हां बहीण-भावंडांना वाढविले. शिक्षण देऊन सन्मानाचे जीवन दिले.

बहीण सुनिता भगवान जगताप कुटुंब संगोपन आणि धम्म कार्यात सहभागी असतात. बंधु विष्णू तायडे विद्युत विभागात ऑपरेटर म्हणून सेवा बजावत आहेत. धाकटे बंधु राहुल तायडे विद्युत विभागात सक्रियपणे कार्यरत आहेत. आई-अण्णांच्या संस्काराने मी शैक्षणिक-सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात प्रामाणिकपणे उभा आहे. आज आम्ही जे काही आहोत ते केवळ विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आई-अण्णां मुळेच. स्वाती, अजय, शुभम, वैभव, मधुरा, सुबोध, सम्यक, रसिका, किया, सक्षम ही नातवंडे म्हणजे दुधावरील सायीप्रमाणेच! नातवंडे अंगा-खांद्यावर खेळविणारे, सुना लेकीप्रमाणे सांभाळणारे कुटूंबवत्सल अण्णा सदोदित आमच्या ह्रदयात राहतील. आमचे बंधू मार्गदर्शक-साहित्यिक प्रोफेसर डॉ. संजय जाधव यांच्या विषयी ते अभिमानाने बोलत. आमच्या मित्रांवर निरपेक्ष प्रेम करणारे अण्णा! बालासाहेब इंगळे, भीमयुगकार रानबा गायकवाड, डॉ. रमेश इंगोले, राजू डापकर, शंकर सिनगारे, बबन मस्के, अनिलकुमार साळवे, लहू कांबळे, संतोष पोटभरे, तानाजी चौरे, विनोद लांडगे, बा. सो. कांबळे, प्रदिप भोकरे, अरुण सरवदे, चंद्रकांत जोगदंड, विकास वाघमारे, स्वप्नील सिध्दांती, मदन ईदगे, मिलिंद मस्के आदि असंख्य स्नेही-सन्मित्रांना अण्णांनी जीव लावला.

अस्तित्वाच्या जाणीवेच्या ठिणगीचे एका झगझगीत प्रकाशात रुपांतर करून वंचीत घटकांमध्ये लढण्याची जिद्द व समता निर्माण करणे आंबेडकरी चळवळीचा मुख्य उद्देश राहिला आहे. या चळवळीतील कार्यकर्त्यांनी, लोककवी-गायकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार व मुल्यातून प्रेरणा घेऊनच कार्य केले आहे. याच प्रेरणेतून स्मृतिशेष आबाजीराव तायडे व सहकारी यांनी समाज सुधारक गायन मंडळाच्या माध्यमातून सांस्कृतिक चळवळ उभी केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तेजाचे एक वलय निर्माण केले. ज्याच्या किरणांनी अनेक कवी-गायक-जलसेकार, लेखक, समीक्षक व विचारवंत विविध वैचारिक क्षेत्रांमध्ये निर्माण झाले. काहींनी इतिहासातील दलितांचे शौर्य, कर्तबगारी बौद्धिक संपत्ती यावर संशोधन सुरु केले तर लोककवी वामनदादा कर्डक सारख्या भीमशाहिरांनी आंबेडकरी विचार जनमानसात रुजविण्यासाठी प्रयत्न केले. यात आमचे वडील स्मृतिशेष आबाजीराव तायडे व सहकारी यांच्या समाज सुधारक गायन मंडळाचेही भरीव योगदान आहे.

आत्मसन्मान आणि सत्तासंघर्ष याची सुरवात संगीत आणि गाण्यांमधून होणाऱ्या सांस्कृतिक रुढींचा विरोध आणि उठाव यातून होताना दिसून येते. गाण्यांमधून व संगीतामधून निर्माण होणाऱ्या आठवणी आणि त्यात असणाऱ्या भावनांना जागृत करण्याची क्षमता ही दलित लढा सातत्याने सुरु ठेवण्यासाठीचे शक्तीस्त्रोत ठरले आहे. आंबेडकरी जलसा हे त्याचे ठळक उदाहरण आहे. आंबेडकरी दलित रंगभूमी ही देखील दलित समजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक पुनर्रचनेसाठी उत्प्रेरक ठरली आहे. याची सुरवात आंबेडकरी संमेलनातून होऊन टप्प्याटप्प्याने लोकनाट्य, पथनाट्य यातून प्रगत झाले. लोकशाहीर वामनदादा कर्डक या प्रख्यात शाहीरांनी लिहिले आहे,

> "तुफानातले दिवे आम्ही, तुफानातले दिवे"

ही सर्व गाणी साधी पण शक्तिशाली होती. तरीही, यापैकी बहुतेक लोककलावंत लोकप्रियता प्राप्त नाहीत कारण प्रसिद्धी मिळविणे हा त्यांचा उद्देशच नसतो. तथापि, जनतेवर आणि महाराष्ट्रात विवेकबुद्धी निर्माण करण्याचा त्यांचा




प्रभाव अफाट आहे. त्यांच्या गाण्यांसह, शाहीर लोकांपर्यंत पोहोचले. शाहीर भीमराव कर्डक यांचा जलसा पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकदा म्हणाले, "माझ्या दहा सभा व मेळावे आणि कर्डक यांचा एक जलसा समान आहे." बहुजन समाजातील कलाकारांनी बहुजनांच्या प्रबोधनासाठी सादर केलेली कलाकृती म्हणजे जलसा असं त्याचं स्वरूप होतं. समाजातील परिस्थितीचं वर्णन करून लोकशिक्षण, मनोरंजन असं त्याचं स्वरूप होतं. सावकार, ब्राह्मण यांच्या दडपणाखाली हलाखीचं जीवन जगणाऱ्या बहुजन समाजाला जागं करणं, विचार करायला लावणं हे त्याचं उद्दिष्ट होतं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सांस्कृतिक लढाईस लोककवी-गायकांनी लेखन-गायनाने बळकटी दिली आहे.

प्रसिद्धी पासून कायमच अलिप्त राहून, झगमगाटाला न भुलता साधेपणाने व प्रामाणिकपणे आयु. आबाजीराव तायडे यांनी १९६५ ते १९८० या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी कार्यातून व लोककवी वामनदादा कर्डकांचा आदर्श समोर ठेवून बुद्ध-भीम गीतातून प्रबोधन कार्य केले. गिरवली सबस्टेशन बुध्द विहार समिती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव, पंचशील बुद्ध विहार आणि सम्राट अशोक विचार मंच, परळी वैजनाथ जिल्हा बीड यांच्या माध्यमातून त्यांनी धम्मकार्य केले. १९८० ते २०१० दरम्यान त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात तंत्रज्ञ म्हणून सेवा केली. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या नाट्य स्पर्धेत सहभागी होत नेपथ्य व प्रकाश आयोजनात सक्रिय असत. त्यांच्या रंगभूमीवरील संचारामुळेच मलाही प्रेरणा व प्रोत्साहन मिळाले. ज्येष्ठ साहित्यिक-संपादक भीमयुगकार रानबा गायकवाड लिखित आणि प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे दिग्दर्शित 'भीमयुग' या नाटय निर्मितीत त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. "गुणवंत तंत्रज्ञ" म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वतीने त्यांचा सेवा गौरवही करण्यात आला.

मला अण्णा मधील अनेक गोष्टी आवडतात, माणसाचं वैभव त्यांनी गोळा केलं. रक्तापलीकडील कितीतरी नाती त्यांनी तयार केली. ती नाती जोपासली. आमच्या आई-अण्णांचं जे माणसं लाभण्याचं भाग्य आहे ते आपसूकच माझ्या वाट्याला आलं आहे. प्रिय अण्णा, तुमच्या त्यागाला, परिश्रमाला आम्ही शब्दांत मांडूच शकत नाहीत. तुमच असणं आमच्यासाठी सर्वकाही होतं... ते आमच्या आयुष्यातील एक सुंदर पर्व होतं... आज सर्व काही असण्याची जाणीव आहे... पण तुम्ही नसणे ही मोठी उणीव आहे...

आपुलकी व माणुसकी या गोष्टींची ज्यावेळी चर्चा होईल, त्यावेळी सर्वात अगोदर अण्णा, तुमची आठवण येईल. व्यक्ती जन्म घेतो त्या व्यक्तीचे हे जग सोडून जाणे अटळ आहे. म्हणजेच ज्याला जन्म आहे त्याला मृत्यू सुद्धा आहे पण अलीकडे आपण एका माणुसकी हरवलेल्या जगामध्ये जगत आहोत. प्रत्येकाला एक दिवस मरणाला सामोरे जावे लागणार आहे. हा निसर्गाचा नियमच आहे. तो कोणाला चुकलेला नाही. परंतु जीवन जगत असताना आपल्या हातून कोणाचेही मन दुखावले जाऊ नये, याची आपण काळजी घेतली पाहिजे. आपल्या सहवासात असणारा प्रत्येक व्यक्ती एक दिवस आपल्या पासून दूर निघून जाणार आहे. ही भावना मनात ठेवून आपण त्यांच्याशी आपुलकीने वागले पाहिजे. हीच शिकवण आपण आम्हाला देऊन गेलात. वडील आणि सूर्य यात एक साम्य आहे दोघांच्या नसण्याने आपल्या आयुष्यात अंधार होतो. तुमच्या निधनाने हातात हात घेऊन चालणारी प्रेरणा हरपली! तुमचे संस्कार आणि विचार घेऊनच जीवन पथावर चालत राहू..

> "अंधाऱ्या रात्रीतुन सूर्य उगवण्याची बात करू,
> संकटांशी मित्रा धीराने दोन हात करू...
> काल सुख आज दुःख दोघांना आबाद करू..
> वादळे-तुफान येतील, छाती पोलाद करू...
> पराजयाची भीती नको, शत्रुवर प्रहार करू,
> सारे एकजुटीने पुन्हा, नवा एल्गार करू
> आपुलकीने माणूसकीचा, नवा गाव उभारू...."

अशीच प्रेरणा देऊन गेलात. प्रिय अण्णा, आयुष्यातील येणाऱ्या सर्व आव्हानांना कसे सामोरे जावे हे तुम्हीच आम्हाला शिकवले... दिवसरात्र कष्ट करून, स्वतःच्या आनंदाचा त्याग करून आम्हाला आनंदी जीवन दिले. ज्यांच्यामुळे आमची ओळख आहे ते म्हणजे आमचे आदरणीय 'अण्णा'...! तुम्ही आमच्या चांगल्या आणि वाईट काळात नेहमी आमच्या सोबत होतात नेहमी असेच आमच्या पाठीशी रहा.

श्रद्धेय अण्णा, तुम्ही अपार कष्ट सोसले, स्वसुख भोगायचे राहून गेले, रंजल्या-गांजलेल्याना जीव लावला, सर्वांच्या कल्याणासाठी देह झिजविला! क्षणो क्षणी आता तुमचीच आठवण येते... जीवलग लोकांच्या दूर जाण्याने डोक्यावरच छप्पर नाहीसं होतं आणि पायाखालची जमीन सरकते. दुःखाचा डोंगर कोसळतो. जीवन जितकं सुंदर आहे तितकच ते दुःखद सुद्धा आहे. आपल्या आयुष्यात येणाऱ्या दुःखाला आपण धैर्याने सामोरं गेलं पाहिजे, कारण दुःख ही सुखाची दुसरी बाजू आहे.

खरंच जीवन जितकं सुंदर आहे तितकच ते वाईट पण आहे. असं वाटतं आपल्या प्रिय लोकांनी आपल्याला कधीच दूर सोडून जाऊ नये, पण निसर्गाच्या पुढे कुणाचे काही चालत नाही. कारण ज्याला जन्म आहे त्याला मृत्यू पण आहे. हे चार दिवसांचं आयुष्य आपण खूप आनंदाने जगलं पाहिजे. आपल्या आयुष्यात आपण इतरांचा तिरस्कार कधीच केला नाही पाहिजे. इतरांचं मन अजिबात दुखावलं नाही पाहिजे. आपल्या व इतरांच्या आयुष्यावर प्रेम केलं पाहिजे, खऱ्या अर्थाने चांगला माणूस म्हणून जगलं पाहिजे. हीच शिकवण अण्णा तुम्ही आम्हाला दिली. २९ एप्रिल २०२१ रोजी अण्णांनी जगाचा निरोप घेतला.

आयुष्यभर तुमच्या सहवासाची उणीव मात्र भासत राहील. तुम्ही आम्हाला एवढं प्रेम दिलं की ते प्रेम, प्रेम करणाराचा समजू शकतो. तुमचं प्रेम आणि तुमचे आशिर्वाद सदैव आमच्यासोबत असतील.

- **"आज स्मृतींच्या पानांवर उमलून आले नाव प्रिय अण्णांचे,**
- **भीमशाहीरांचे ते स्वर,**
- **गुंजले दशदिशांचे...**
- **महापारेषणच्या सेवेत रमले,**
- **गुणवंत ते तंत्रज्ञ,**
- **सामाजिक, सांस्कृतिक, धम्मकार्यात सक्रिय सहभाग, निष्ठावंत...**
- **अण्णा, तुम्ही होता दीपस्तंभ, प्रेरणादायी जीवनगाथा,**
- **गोरगरिबांच्या मदतीला धावले, जोडली स्नेहाची मंगलगाथा.....**
- **तुमच्या वाणीत होता सत्य आणि न्यायाचा हुंकार,**
- **धम्माच्या मार्गावर चालताना, दाखविला सदाचार.....**
- **पाचवे पुण्यस्मरण तुमचे, अन् डोळ्यांत दाटले पाणी,**
- **तुमच्या आठवणींचा सुगंध, दरवळतो अजूनही जीवनी....**
- **तुमचे विचार, तुमची शिकवण, जपून ठेवू आम्ही मनी,**
- **तुमची स्मृती चिरंतन राहील, या जगात अमुच्या ध्यानी....**
- **आदर्शांचे तुमचे जीवन, आम्हांस सदैव प्रेरणा देईल,**
- **तुमच्या पावलांवर पाऊल ठेवत, समाजसेवा अविरत चालेल तुमच्या पवित्र स्मृतीस,अर्पितो भावपूर्ण आदरांजली!**

**- प्रा.डॉ.सिद्धार्थ सत्यभामा आबाजी तायडे
पंचशील नगर, परळी वै.
मो. 9822836675**

## लोकमानस

# मुलखावेगळी माणस : पाच वर्षीय रिद्धीचा अनोखा विक्रम

अंगी असलेले कौशल्य दाखवण्यासाठी वयाची मर्यादा नसते, जिद्द आणि करण्याची आवड असल्यास आपण काहीही करू शकतो असे अनुभव अनेकवेळा पाहायला मिळतात. त्यातच शहरातील 5 वर्ष 10 महिन्यांच्या रिद्धी तोषनीवाल या चिमुरडीने आगळा वेगळा विक्रम प्रस्थापित केलाय. 'सिलंबम' या प्रकारात तिनं आपली कला सादर करत गोल्डन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये जागतिक विक्रम स्थापित केलाय.सिलंबम म्हणजे महाराष्ट्रातील लाठीकाठी मधील एक प्रकार आहे. ज्यामध्ये एका मिनिटात 114 हून अधिकवेळा रिद्धीने दोन्ही हातांनी एकाचवेळी काठी फिरवली. अवघ्या तीन महिन्यात तिने ही कला अवगत करून विक्रमाला गवसणी घातली आहे. लहानपणीच तिची जिद्द दिसून आल्यानं तिला शिकवणे सोपे झाल्याचं प्रशिक्षकांनी सांगितलं.

संभाजीनगर येथील रिद्धी विपिन तोषनीवाल (वय 5 वर्ष 10 महिने) हिने पारंपरिक भारतीय मार्शल आर्ट सिलंबममध्ये एक अद्वितीय जागतिक विक्रम प्रस्थापित केलाय. इतक्या कमी वयात एकाचवेळी दोन्ही हातांनी काठी फिरवते. त्यांच्या हातांची गती पाहून भलेभले आवक झाल्याशिवाय



राहणार नाहीत. रिद्धी तिची जुळी बहिण सिद्धीसोबत कराटे प्रशिक्षणासाठी सांस्कृतिक क्रीडा मंडळ येथे जाते. तिच्या प्रशिक्षकांकडं पाहून सिलंबम म्हणजे मराठीमधील लाठीकाठी फिरवणे खेळण्याची इच्छा झाली. तिचे प्रशिक्षक आणि वडिलांनी तिला प्रोत्साहन देण्याचं ठरवलं.तिनं प्रशिक्षण सुरू केल्यावर तीन महिन्यातच चांगल प्राविण्य मिळवलं, तिचा खेळ पाहून इतक्या गतीने कोणी काठी फरवली का? याबाबत इंटरनेटवर शोध घेण्यात आला. त्यावेळी याआधी आठ वर्षाच्या मुलीने एक मिनिटात एका हाताने ऐंशी वेळा काठी फिरवण्याचा विक्रम असल्याचं कळलं. त्यावर रिद्धीची गती मोजल्या ती शंभरहून अधिकची आली. त्यानुसार गोल्डन बुक ऑफ रेकॉर्ड कडे अर्ज करण्यात आला. त्याची प्रत्यक्षात मोजणी केल्यावर एका मिनिटात एकाच वेळी दोन्ही हातांनी 114 हून अधिकवेळा काठी फिरवल्याच नोंदवलं गेलं. त्यानुसार सर्व प्रक्रिया केल्यावर तीन महिन्यांनी हा नवा विक्रम असल्याचं गोल्डन बुक ऑफ रेकॉर्डकडून तोषणीवाल यांना सांगण्यात आलं.

रिद्धीचे प्रशिक्षक प्रथमेश पुसे हे रोज काठी फिरवण्याचा सराव करत असतात. तीन महिन्यापूर्वी ते सराव करत असताना रिद्धीला उत्सुकता निर्माण झाली आणि तिने वडिलांकडे सिलंबन खेळण्याची इच्छा दर्शवली, वडील विपिन तोषनीवाल यांनी त्या खेळाची माहिती घेतली. त्यावेळी रिद्धीला आपल्या देशातील असलेली प्राचीन कला शिकवण्याचा निर्णय पालकांनी घेतला. अवघ्या तीन महिन्यात तिने कला अवगत केली, शिवाय त्याला गतीने करण्याचा प्रयत्न केला. रोज अर्धा ते एकतास रोज न थकता तिने सराव केला. त्यामुळंच तिनं आगळावेळगळा विक्रम प्रस्थापित केला अशी माहिती, प्रशिक्षक प्रथमेश पुसे यांनी दिली.

# दखल : भावी कलाकारांना घडविणारा उत्सव झेस्टफेस्ट

आपल्यापैकी प्रत्येकामध्ये एक सुप्त कलाकार दडलेला असतो, परंतु प्रत्येकाला एक कलाकार व्यक्त व्हायला सुयोग्य असे व्यासपीठ उपलब्ध होतेच असे नाही.परंतु समाजातील अशाच आजच्या हूरहुन्नरी आणि उद्याच्या भावी कलाकारांना मुक्त कलामंच उपलब्ध करून देणारा उत्सव अर्थातच झेस्टफेस्ट.उद्याच्या भावी कलाकारांना घडविणाऱ्या झेस्टफेस्ट या उत्सवाचे आयोजन नुकतेच मीरा भाईंदर येथील भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृहात करण्यात आले होते. वयवर्ष 5 ते 75 अशा वयोगटातील सुमारे 250 कलाकारांनी या उत्सवात अतिशय चित्तथरारक मल्लखांब तसेच विविध नृत्यांचे सादरीकरण करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून टाकले.

राहुल इन्स्टिट्यूट चे वतीने आयोजित झेस्टफेस्ट या रंगारंग कार्यक्रमाला मीरा भाईंदर चे उप महापौर संजय घाडी, सिनेसृष्टीतील सुप्रसिद्ध नृत्यदिगदर्शक उमेश जाधव, चेतन महाजन,आणि नगरसेविका आदिती फुरसुंगे आदी मान्यवर उपस्थित होते.या उत्सवात बॉलिवूड लेडीज ग्रुपने बहारदार लावणी सादर केली तर सेमी क्लासिकल. ग्रुपने कृष्णरास लीला सादर केल्या.मल्लखांब एक ध्यास समूहाने थरारक अशा मल्लखांबाचे दर्शन आपल्या कलाकृतीतून घडविले तर माधुरी दीक्षितचे गाण्यावर नृत्य अदाकारी आणि जोगवा देखील सादर करण्यात आला.

झेस्टफेस्ट या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाला उपमहापौर संजय घाडी यांनी शुभेच्छा दिल्या तर नृत्यदिगदर्शक उमेश जाधव यांनी " प्रत्येक कलाकार हा सुरवातीला शेवटचे रांगेतला ज्युनिअर कलाकारच असतो मात्र त्याला योग्य संधी मिळाली की तो एक दिवस प्रतिथयश कलाकार बनतोच असे सांगून मल्लखांबाचे आपल्याला प्रचंड आकर्षण असून लवकरच आपण एक चित्रपट बनवू "असे आश्वासन देखील दिले

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

Last page

● बीड, बुधवार, 29 एप्रिल 2026

# आष्टी तालुक्यात दिवसाढवळ्या सोन्याची लूट; वृद्ध महिलेवर जीवघेणा हल्ला



आष्टी (प्रतिनिधी) :

आष्टी तालुक्यात दिवसाढवळ्या सोन्याच्या चोरीच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मंगळवारी दुपारी साडेतीन ते चारच्या सुमारास खानापूर येथे एक धक्कादायक घटना घडली.

खानापूर येथील शेतामध्ये राहणाऱ्या वृद्ध महिला छायाबाई संदीप तावरे यांच्यावर अज्ञात इसमाने निर्घृण हल्ला करत त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने लुटून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर इसमाने तोंड बांधून हातात काठी घेऊन छायाबाई यांच्या डोक्यावर जबर मारहाण केली. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्या डोक्याला मोठा मार लागला आहे. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने अहिल्यानगर येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रविण क्षिरसागर यांनी पंचनामा करून तपास सुरू केला आहे.

याबाबत माहिती देताना रवि घोलप यांनी सांगितले की, हल्लेखोर एकटाच होता आणि त्याने चेहरा झाकलेला होता.

दरम्यान, जखमी छायाबाई यांनीही सांगितले की,

"एक इसम अचानक आला, त्याने काठीने डोक्यावर जोरदार मारहाण केली आणि गळ्यातील सोने हिसकावून पळ काढला."

तालुक्यात भीतीचे वातावरण

गेल्या काही महिन्यांपासून आष्टी तालुक्यात सोन्याच्या चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून दिवसाढवळ्या अशा प्रकारच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र भीती आणि संताप व्यक्त केला जात आहे.

पोलीस प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करून आरोपींना जेरबंद करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## प्रसिद्ध श्रृंगेरी देवी मंदिरात चोरी; सीसीटीव्ही वायर कापून चोरट्यांनी लंपास केले चांदीचे टोप, दागिन्याचे पावती नसल्याने पोलिसांनी तक्रार घेणे टाळले



आष्टी | प्रतिनिधी

तालुक्यातील ब्रह्मगाव येथील महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेल्या श्रृंगेरी देवी मंदिरात सोमवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केली. चोरट्यांनी देवीचे चांदीचे दोन टोप आणि काही नकली दागिने लंपास केले आहेत. विशेष म्हणजे, चोरी करण्यापूर्वी चोरट्यांनी मंदिरातील सीसीटीव्हीचे वायर कापले होते, मात्र देवस्थानच्या कार्यालयासमोर असलेल्या कॅमेऱ्यात एक संशयास्पद फुटेज हाती आले आहे.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असतानाच, आष्टी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. चोरीला गेलेल्या चांदीच्या टोपांची अधिकृत खरेदी पावती देवस्थानकडे उपलब्ध नसल्याने पोलिसांनी तक्रार दाखल करून घेण्यास नकार दिल्याची धक्कादायक माहिती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विजय हराळ यांनी दिली आहे.

देवीला अनेक भक्त श्रद्धेपोटी दागिने किंवा वस्तू भेट स्वरूपात देत असतात, अशा वेळी त्याची पावती असणे शक्य नसते. मात्र, पोलिसांनी तांत्रिक कारणावरून तक्रार नाकारल्याने भाविक आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

श्रृंगेरी देवी मंदिर हे महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान असून येथे मोठी वर्दळ असते. मात्र, या मंदिरात चोरी होण्याची ही पहिलीच वेळ नाही. दीड वर्षांपूर्वी देखील अशाच प्रकारे मंदिरात चोरी झाली होती आणि त्यावेळीही चांदीचे टोप चोरीला गेले होते. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे देवस्थान ट्रस्ट त्रस्त झाला असून मंदिराच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या तालुका कार्यकारणी बरखास्त

### डिजिटल मीडियाच्याही कंधार, देगलूर वगळता सर्व तालुका कार्यकारणी नव्याने होणार, बरखास्त झालेल्या सर्व तालुका कार्यकारणींचे नव्याने गठन होणार

**नांदेड** | नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या माहूर आणि अर्धापूर तालुका कार्यकारणी वगळता जिल्ह्यातील इतर सर्व तालुका कार्यकारणी बरखास्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या मान्यतेने आणि जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे, कार्याध्यक्ष अनिल कसबे यांच्या आदेशान्वये हा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच या सर्व तालुका कार्यकारणी नव्याने गठीत करण्यात येतील, अशी माहिती पत्रकार संघाचे जिल्हा सरचिटणीस अनुराग पोवळे यांनी दिली आहे.

नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांचे वेगवेगळे प्रश्न सोडविले जातात. जिल्हा पत्रकार संघाच्या अर्धापूर आणि माहूर तालुका कार्यकारणी वगळता इतर सर्व तालुका

पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी लढणारी मराठी पत्रकार परिषद (स्थापना १९३९) मराठी पत्रकारांची मातृसंस्था

पत्रकार संघाची मुदत संपुष्टात आली आहे. त्यामुळे कार्यरत असलेल्या या सर्व तालुका कार्यकारणी बरखास्त करण्यात येणार आहेत. जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे आणि कार्याध्यक्ष अनिल कसबे यांच्या आदेशानुसार या सर्व कार्यकारणी बरखास्त करण्यात आल्या आहेत.

नव्याने गठित झालेली अर्धापूर आणि माहूर तालुका कार्यकारणी या निर्णयातून वगळण्यात आली आहे. बरखास्त झालेल्या सर्व तालुका कार्यकारणींचे नव्याने गठन करण्यात येणार आहे. नव्या कार्यकारिणीचे जिल्हास्तरावरून निरीक्षक पाठवून गठन करण्यात येणार आहे. स्थानिक पातळीवरील जिल्हा पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून या कार्यकारिणी निवडण्यात येतील, असेही जिल्हाध्यक्ष पांडागळे यांनी सांगितले. त्याचवेळी नांदेड जिल्हा डिजिटल मीडियाच्या देगलूर आणि कंधार या तालुका कार्यकारणी वगळता इतर सर्व तालुक्यांमध्ये नव्याने कार्यकारणी गठीत करण्यात येणार आहेत. यासाठीही जिल्हास्तरावरून निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती डिजिटल मीडियाचे जिल्हाध्यक्ष मुजीब शेख यांनी दिली.

जिल्हा पत्रकार संघाच्या तालुका कार्यकारणी तसेच डिजिटल मीडिया कार्यकारणी निवडी लवकरच करण्यात येणार आहेत. त्याचवेळी जिल्हा पत्रकार संघाची सदस्य नोंदणीही लवकरच सुरू केली जाणार आहे. या निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी याची नोंद घ्यावी, त्याच वेळी कार्यकारणी बरखास्त करण्यात आलेल्या तालुका कार्यकारिणी कोणत्याही स्वरूपात कार्यरत राहणार नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. जिल्हास्तरावरून लवकरच तालुका कार्यकारणी निवडण्यासाठी निरीक्षकांची घोषणा केली जाईल, असेही जिल्हा सरचिटणीस अनुराग पोवळे यांनी सांगितले आहे.

## परळी वैजनाथ रेल्वे स्टेशन परिसरातून उत्तर प्रदेशातील 13 वर्षांची मुलगी बेपत्ता, शोधकार्य सुरु

परळी वैजनाथ - प्रतिनिधी

-परळी वैजनाथ येथील रेल्वे स्टेशन परिसरातून उत्तर प्रदेश राज्यातील एक १२ ते १३ वर्ष वयोगटाची मुलगी बेपत्ता झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून रेल्वे पोलीस प्रशासनाकडून तिचा शोध घेतला जात आहे.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सदर मुलगी ही मूळची उत्तर प्रदेश राज्यातील असून ती परळी वैजनाथ रेल्वे स्टेशन परिसरात आपल्या पालकांसोबत आल्याची माहिती मिळाली त्यानंतर ती मुलगी पाणी आणायला गेली असल्याचे समजत आहे त्यानंतर ती परत न आल्याने पालकांनी तिचा शोध घेतला परंतु मुलगी सापडली नाही, त्यानंतर पालकांनी सदरील बाबत रेल्वे पोलिसांना सांगितली

माहिती मिळताच रेल्वे पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने तातडीने तपास कार्य सुरू केले असून अद्याप पर्यंत शोध लागला नसल्याची माहिती मिळत आहे.




स्टेशन परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात असून, अद्याप या मुलीचा कोणताही सुगावा लागलेला नाही. प्रशासनाकडून ठिकठिकाणी शोध घेतला जात असून या मुलीबाबत कोणास काही माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात 'सेवा हक्क दिन' उत्साहात साजरा





**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने २८ एप्रिल रोजी "सेवा हक्क दिन" उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अधिकारी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सेवा हक्काची शपथ घेतली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका छाया पत्की या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे तसेच प्रा. डॉ. अरुण चव्हाण यांची उपस्थिती होती. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत नागरिकांना सेवा पारदर्शक, वेळेत व सोप्या पद्धतीने देण्याबाबत सर्वांनी शपथ घेतली. सेवा देताना प्रामाणिकपणा, तत्परता व संवेदनशीलता राखण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच सेवा वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होणार नाही यासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प करण्यात आला.कार्यक्रमात उपस्थितांनी नागरिकांच्या हितासाठी कार्य करताना सेवा हक्काचा आदर राखून अधिक जबाबदारीने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. सुत्रसंचलन प्रा प्रविण फुटके यांनी तर प्रास्ताविक प्रा डॉ अरुण चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.